**ठळक बातम्या**

- विधानसभेत अर्थसंकल्पावर चर्चा सुरु /राज्यावर कर्जाचा डोंगर उभा असून राज्य दिवाळखोरीत निघण्याची शक्यता असल्याची सुनील प्रभू यांची टीका

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात पहिल्याच दिवशी लोकसभेत पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर विरोधकांकडून चर्चेची मागणी, गदारोळामुळं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- राज्यात रिक्षा परवान्यांचं वाटप आजपासून स्थगित

- राज्याचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांचा उद्या शपथविधी

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये १ हजार ३५३ अंकांची घसरण

<><><><><>

विधानसभेत आज अर्थसंकल्पावर चर्चा सुरु झाली. राज्य प्रगती करत आहे असं सरकार सांगतं, मात्र राज्यावर कर्जाचा डोंगर उभा असून राज्य दिवाळखोरीत निघण्याची शक्यता असल्याची टीका सुनील प्रभू यांनी, चर्चेला सुरुवात करताना केली. राज्यावर अकरा लाख कोटी कर्जाचा बोजा आहे. महसुली जमा रकमेपैकी तेरा टक्के रक्कम केवळ व्याज भरण्यात जाते, अशा परिस्थितीत राज्य प्रगती कसं करेल, असा प्रश्न प्रभू यांनी उपस्थित केला. एका बाजूला शेतकऱ्यांची वीज तोडली जाते, दुसरीकडे भांडवलदारांचे कर्ज माफ केलं जातं, असा आरोप त्यांनी केला.

राज्य महिला आयोगाला पुरेसा निधी मिळत नसून कर्मचाऱ्यांची कमतरता आहे असा मुद्दा विधानसभेत सुधीर मुनगंटीवार, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत मांडला. जनजागृती, संशोधन ही आयोगाची कामं आहेत, मात्र निधी मिळत नसल्यानं ही कामं करता येत नाहीत असा आरोप पाटील यांनी केला.

यावर आयोगाकडून जेवढ्या निधीची मागणी होते तेवढा निधी दिला जातो असं राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितलं.

<><><><><>

'बेस्ट'च्या मालकीच्या बसची संख्या वाढवण्याच्या दृष्टीनं सरकार उपाययोजना करत आहे, असं राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं.

<><><><><>

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यातल्या कामकाजाला आज सुरुवात झाली. मात्र लोकसभेत आज पहिल्याच दिवशी विरोधकांनी पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर चर्चेच्या मागणीवरून केलेल्या गदारोळामुळं लोकसभेचं कामकाज आज दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं. आज सकाळी लोकसभेच्या कामकाजाला सुरुवात झाल्यावर अलिकडेच निधन झालेले शिलाँगचे खासदार डॉ. रिकी अँड्र्यू जे. सिंकोन यांना श्रद्धांजली वाहिल्यानंतर आधी कामकाज १२ वाजेपर्यंत कामकाज तहकूब करावं लागलं. कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर सभागृहानं टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषकविजेत्या भारताच्या संघाचं अभिनंदन केलं, त्यानंतर परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर सभागृहात निवेदन केलं. या भागातला तणाव कमी करण्यासाठी संवाद आणि मुत्सद्देगिरीचा अवलंब करण्याची गरज त्यांनी मांडली. त्यांचं निवेदन सुरु असताना विरोधी सदस्यांनी फलकांसह हौद्यात येत पश्चिम आशियातल्या संघर्षावर चर्चेची मागणी केली. दुपारी ३ वाजता दुसऱ्यांदा कामकाज सुरू झाल्यावर पीठासीन अधिकारी जगदंबिका पाल यांनी काँग्रेसच्या सदस्यांना लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या विरुद्धचा अविश्वास प्रस्ताव मांडायला सांगितलं. मात्र, काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष आणि इतर विरोधी सदस्यांनी पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर चर्चेची मागणी लावून धरत गदारोळ केला. त्यामुळे अखेर कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

लोकसभा अध्यक्षांविरुद्धच्या प्रस्तावावर सरकार चर्चेसाठी तयार असतानाही विरोधी पक्ष इतर मुद्द्यांवरून गोंधळ घालत असल्याबद्दल संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी नाराजी व्यक्त केली. विरोधक गोंधळलेले आहेत, आपल्या आयुष्यात आपण इतका बेजबाबदार विरोधी पक्ष पाहिला नाही अशी टीका त्यांनी केली.

दरम्यान महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी केंद्र सरकारनं वित्तीय आणि व्यापार धोरणासह अनेक प्रशासकीय उपाययोजना केल्या असल्याची माहिती अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत एका लेखी उत्तरात दिली. जर कच्च्या तेलाच्या किमती मूळ अंदाजापेक्षा १० टक्क्यांनी जास्त राहिल्या आणि त्याचा देशांतर्गत किमतींवर पूर्ण प्रभाव पडला, तर महागाई ३ दशांश टक्क्यानं वाढू शकते असं त्यांनी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या एका अहवालाचा संदर्भ देऊन या उत्तरात म्हटलं आहे.

<><><><><>

देशात इंधन प्रक्रियेनंतर अंदाजे १ हजार ९०० दशलक्ष मेट्रिक टनांपेक्षा जास्त वापरायोग्य तेलइंधन साठा, तसंच नैसर्गिक वायू इंधनाचा १ हजार ८०० अब्ज घनमीटरपेक्षा जास्त साठा उपलब्ध असल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी आज राज्यसभेत एका लेखी उत्तरात दिली. देशात कच्च्या तेलाचा ४२३ दशलक्ष मेट्रिक टनापेक्षा जास्त आणि नैसर्गिक वायूचा ५९५ अब्ज घनमीटरपेक्षा जास्त साठा असल्याचं त्यांनी या उत्तरात म्हटलं आहे. सध्याच्या अस्थिर भू राजकीय परिस्थितीच्या काळात ऊर्जा पुरवठा साखळी सुरळीत राहावी यासाठी केंद्र सरकारनं विविध स्त्रोतांकडून कच्चे तेल आयात करणं, संघर्षग्रस्त क्षेत्रं टाळणं आणि प्रमुख तेल उत्पादक देश तसंच आंतरराष्ट्रीय ऊर्जा यंत्रणा ओपेक ही पेट्रोलियम निर्यातदारांची संघटना आणि आंतरराष्ट्रीय ऊर्जा मंचासोबतचे राजनैतिक संबंध दृढ करण्यासारख्या उपाययोजना केल्या असल्याचं त्यांनी या उत्तरात म्हटलं आहेत.

प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत केंद्र सरकारनं आतापर्यंत गरीब कुटुंबातल्या महिलांना, घरगुती वापराच्या गॅसच्या १० कोटी ५१ लाख जोडण्या दिली असल्याची माहितीही त्यांनी आणखी एका लेखी उत्तरात दिली आहे.

राज्यसभेत आज पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या कामकाजावर चर्चा सुरु झाली. भाजपाचे घनश्याम तिवारी यांनी वनक्षेत्र वाढवण्यासह पर्यावरण रक्षणासाठी सरकारनं केलेल्या प्रयत्नांची प्रशंसा केली. जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी भारतात १८ टक्के लोकसंख्या असली तरी केवळ ४ टक्केच वापरण्यायोग्य गोडं पाणी आहे, या पार्श्वभूमवर देशातल्या ६० कोटी लोकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो असा अंदाज नीयी आयोगानं व्यक्त केला असल्याचा मुद्दा वायएसआर काँग्रेस पक्षाचे अयोध्या रामी रेड्डी अल्ला यांनी मांडला. जलसुरक्षेच्या मुद्याला पर्यावरणीय प्रशासनापासून वेगळं करता येणार नाही, असं ते म्हणाला.

<><><><><>

राज्यातल्या शहरांमध्ये होणारी वाहतूक कोंडी आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांमुळे रिक्षाच्या परवान्यांचं वाटप आजपासून स्थगित करत असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज दिली. यंदाच्या आर्थिक सर्वेक्षणानुसार १ जानेवारी २०२६पर्यंत राज्यात १२ लाख ९६ हजार रिक्षा धावत आहेत. राज्यातल्या अनेक शहरांमध्ये वाहतूक कोंडी आणि वायूप्रदूषण होत असल्याच्या तक्रारी येत होत्या. त्यामुळे हा निर्णय घेतला असल्याचं त्यांनी सांगितलं.

काही अटीशर्तींची पूर्तता करूनच परवाने देता येतील का, याविषयी केंद्राशी चर्चा सुरू असून त्यानंतरच अंतिम निर्णय जाहीर होईल, असंही ते म्हणाले. याशिवाय राज्य शासनानं ओला, उबेर आणि रॅपिडोच्या इलेक्ट्रिक बाईकचे परवानेही रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचं सरनाईक यांनी सांगितलं.

**होल्ड... बाईट - प्रताप सरनाईक**

भविष्यात सुरक्षेचे निकष पूर्ण केले तर या कंपन्यांना पुन्हा परवानगी मिळू शकेल, असंही सरनाईक यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

राज्याचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांचा शपथविधी उद्या संध्याकाळी मुंबईत लोकभवन इथं होणार आहे. मुंबई उच्च न्यायलयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय त्यांना शपथ देतील.

जिष्णुदेव वर्मा यांचं आज मुंबईत सपत्नीक आगमन झालं. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचं स्वागत केलं. एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार हे दोन्ही उपमुख्यमंत्री, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, यांच्याखेरीज राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुख्य सचिव, पोलीस महासंचालक इत्यादी मान्यवर त्यावेळी उपस्थित होते. लोकभवन इथं नवनियुक्त राज्यपालांना पोलिसांनी मानवंदना दिली.

**<><><><><>**

मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाचे पडसाद आजही देशातल्या शेअर बाजारांवर उमटले. कच्च्या तेलाच्या दरात झालेली वाढ आणि जागतिक बाजारपेठेत विक्रीचा वाढलेला वेग यांमुळे आज दिवसाच्या सुरुवातीपासूनच शेअर बाजारांमध्ये घसरण सुरू होती. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर १ हजार ३५३ अंकांची घसरण झाली आणि तो ७७ हजार ५६६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ४२२ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार २८ अंकांवर बंद झाला.

परकीय चलन बाजारांमध्ये रुपया ५८ पैशांनी घसरून ९२ रुपये आणि ३३ पैसे प्रति डॉलरच्या नीचांकी पातळीवर आला.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या दरांमधे वाढ झाली आहे. होर्मुझमार्गे वाहतूक बंद झाल्यानं पुरवठ्यावर परिणाम झाला आहे, तसंच युद्ध स्थितीमुळे कुवैत आणि संयुक्त अरब अमिरातींसारख्या देशांनी खनिज तेल उत्पादन आणि निर्यातीत कपात केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सध्या कच्च्या तेलाचं मूल्य प्रतिबॅरल ११० डॉलर्सच्या पुढे गेलं आहे. गेल्या सात दिवसात या दरात ५५ टक्क्यापेक्षा जास्त वाढ झाली आहे.

**<><><><><>**

देशभरात आरोग्य क्षेत्रातल्या पायाभूत सुविधा अधिक मजबूत झाल्या असून जनतेच्या आकांक्षा हा अर्थसंकल्पाचा पाया आणि सरकारची जनतेसाठीची वचनबद्धता असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते 'सबका साथ सबका विकास' या धोरणाअंतर्गत अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला संबोधित करत होते. आयुष्यमान भारत योजनेच्या माध्यमांतून विविध ठिकांणी आरोग्य सेवांचा विस्तार झाला आहे, याचा उल्लेख त्यांनी केला.

….. **होल्ड बाईट- प्रधानमंत्री - - -**

भविष्यात मुलींना तंत्रज्ञानात समान संधी मिळाव्यात आणि तरूण संशोधकांना नवोन्मेष आणि नवनवीन प्रयोग करण्यास प्रोत्साहित करणारी एक मजबूत संशोधन परिसंस्था निर्माण करणार असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग आणि कॉमिक्स या क्षेत्राच्या प्रगतीकडे लक्ष दिलं जाणार आहे. तसंच शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या कॅम्पसमध्ये उद्योग व्यवसायात सहकार्य आणि संशोधनावर भर देणाच्या गरजेकडे लक्ष दिल्यास विद्यार्थ्यांना वास्तविक जगाचे अनुभव मिळतील असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन्, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या विजयासाठी भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे. विश्वचषक जिंकल्याबद्दल, आज संसदेच्या आणि राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातही भारतीय संघाचं अभिनंदन करण्यात आलं. तीन विश्वविक्रम नोंदवत मिळवलेल्या या विजयाबद्दल आनंद व्यक्त करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले...

**- - होल्ड - बाईट- मुख्यमंत्री - - -**

**<><><><><>**

मुंबईत गिरणी कामगारांच्या घराच्या प्रलंबित मागणीसाठी उद्या विधानभवनावर मोर्चा काढण्याचा निर्णय गिरणी कामगार संयुक्त संघर्ष समितीने घेतला आहे. गिरणी कामगारांसाठी म्हणून बांधलेली घरं तात्काळ लाभार्थ्यांना हस्तांतरित करावी, आणि सर्व लाभार्थ्यांना मुंबईतच घरं द्यावी या मागणीसाठी मोर्चा काढणार असल्याचं राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांनी सांगितलं. विविध १६ संघटना यात सहभागी होणार असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

**<><><><><>**

अमेरिकेसोबतचा मुक्त व्यापार करार, शक्तिपीठ महामार्ग, आणि इतर सामाजिक प्रश्नांवर प्रदेश काँग्रेसनं आज सरकार विरोधात हिंगोली इथं पदयात्रा काढली. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या पदयात्रेचं नेतृत्व केलं. कळमनुरी इथून सकाळी अकरा वाजता सुरू झालेली पदयात्रा हिंगोलीत धडकली. आदिवासी आणि वंचित घटकांच्या विविध समस्यांबाबत या पदयात्रेतून सरकारच्या विरोधात मोठ्या घोषणा देऊन जनतेचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात विदर्भात अनेक ठिकाणी, मराठवाड्यात काही ठिकाणी, तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान अकोला इथं ४० पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान खात्यानं व्यक्त केली आहे. राज्यातल्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यता आहे. इतरत्र हवामान कोरडं राहिल.

**//<><><><><>//**